# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.10.2024** **वार – मंगळवार**

---

**नाराजी दूर भाजपा**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता; त्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक ठिकाणी विविध पक्षांच्या अधिकृत उमेदवारांची अर्ज भरण्याची लगबग दिसून आली; दुसरीकडे उमेदवारीसाठी इच्छुक पण संबंधित राजकीय पक्षाकडून तिकिट न मिळालेले काही उमेदवार नाराजी व्यक्त करतानाही दिसले.

भारतीय जनता पार्टीला पुणे शहरातील नाराजांची समजूत काढावी लागली. वडगाव शेरी मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेल्याने नाराज झालेले भाजपाचे माजी आमदार जगदीश मुळीक आज अपक्ष म्हणून अर्ज भरण्यासाठी निवडणूक कार्यालयापर्यंत पोहोचले. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुळीक यांना भ्रमणध्वनीवर संपर्क करून त्यांच्या कार्यकर्त्यांशी जाहीर संवाद साधला. आणि मुळीक यांना भविष्यात योग्य संधी दिली जाईल असं आश्वासन दिलं.

कसबा विधानसभा मतदारसंघात भाजपाने हेमंत रासने यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज असलेले भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे तसंच पर्वती मतदारसंघातून इच्छुक असलेले श्रीनाथ भिमाले यांच्याशी केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संवाद साधून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. रासने यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कसबा गणपती मंदिरात रासने, मोहोळ यांच्यासह घाटे आणि भिमालेही आज उपस्थित होते. तर कोथरूड मतदार संघातून चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी दिल्याने नाराज असलेले अमोल बालवडकर यांनी पाटील यांची भेट घेत पक्षाचं काम करणार असल्याचं सांगितलं.

**रिपब्लिकन पार्टी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुण्यातले प्रमूख पदाधिकारी आणि पुणे महापालिकेचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी आपल्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. महायुतीमध्ये आरपीआयला सन्मानाची वागणूक मिळत नाही, अशी खंत त्यांनी, पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांना पाठवलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.

**मतदान जनजागृती**

पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात Know Your Polling Station हा कक्ष संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियत्रंणाखाली स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाशी दूरध्वनीवरून अथवा समक्ष संपर्क साधल्यावर नागरिकांना त्यांचं मतदार यादीतील नाव शोधून द्यायला मदत करण्यात येईल. महापालिकेच्या सारथी ॲपवरही याविषयीची माहिती उपलब्ध असून मतदान ओळखपत्र अथवा आधार क्रमांकाच्या सहाय्याने मतदारांना आपल्या मतदान केंद्राची माहिती मिळू शकेल. दरम्यान पिंपरी विधानसभा मतदारसंघामध्ये सहा नव्या मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ही मतदान केंद्र विविध गृहनिर्माण संस्थांमध्ये आहेत.

**भिडेवाडा**

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडेवाड्यात सुरू केलेल्या मुलींच्या पहिल्या शाळेचा इतिहास जतन व्हावा, तो घराघरात पोहोचावा या उद्देशाने 'भिडेवाडा काव्यजागर अभियान' राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नुकतंच भिडेवाडा कवीसंमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्याला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास शंभराहून अधिक कवींनी आपल्या रचना सादर केल्या. या संमेलनाचं एक वैशिष्ट्य म्हणजे संमेलनात सहभागी सर्व कवयित्रींनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून सादरीकरण केलं.

**दिवाळी**

प्रकाशाचा उत्सव असलेल्या दीपावलीचा सर्वत्र उत्साह दिसत आहे. आज धनत्रयोदशीनिमित्त सराफी पेढ्यांवर खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. दिवाळीच्या निमित्ताने विविध सामाजिक संस्था अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन करत आहेत.

**सायन्सपार्क**

पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या वतीने दिवाळीनिमित्त 'इसरो- स्पेस ऑन व्हील्स', पर्यावरण पूरक किल्ले बनवण्याची स्पर्धा, शास्त्रीय गायन, वाचन स्पर्धा आणि सूर नभांगणीचे अशा विविध सांस्कृतिक आणि वैज्ञानिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. सायन्स पार्कच्या प्रांगणामध्ये होणारे हे सर्व कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून रसिकांनी या सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असं आवाहन सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे यांनी केलं आहे.

**एसटी**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना गाडीविषयी माहिती उपलब्ध व्हावी यासाठी राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी प्रशासनाने 8766054235 हा क्रमांक सुरू केला आहे. त्यावर प्रवाशांनी संबंधित गाडीबाबत माहिती हवी आहे असा संदेश पाठवल्यावर काही मिनिटांत या संदेशाला उत्तर दिलं जाईल, अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाचे नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली.

**वीणा देव निधन**

मराठीतील ज्येष्ठ लेखिका प्राध्यापिका डॉक्टर वीणा देव यांचं आज पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या 75 वर्षांच्या होत्या. गेले काही दिवस त्या आजारी होत्या. वीणा देव या ज्येष्ठ इतिहास अभ्यासक आणि लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या तर अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिव देहावर आज रात्री 9 च्या सुमारास पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अन्त्य संस्कार करण्यात येणार असल्याचं त्यांच्या निकटवर्तियांनी कळवलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. उद्याही हवामान कोरडं राहून कमाल तापमान 34 अंशांच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**